# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

**(Formerly Pune University)**

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दुरध्वनी क्रमांक : ०२०–२५६२११८८/८९
ई मेल : **affiliation@pun.unipune.ac.in**
संकेतस्थळ : **www.unipune.ac.in**

**Academic Section (Affiliation Unit)**
**Ganeshkhind, Pune - 411007**
**Phone : 020-25621188/89**
**Email : affiliation@pun.unipune.ac.in**
**Website : www.unipune.ac.in**


संदर्भ क्रं. सीए/१६०२ दिनांक : २२/१०/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित
सर्व संबंधित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

**विषय — महाविद्यालय/परिसंस्थांच्या स्थानांतरणाबाबत...**
**संदर्भ — सीए/२०३६, दि. २६/१२/२०२५ चे पत्र**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून प्राप्त आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नित असलेले काही महाविद्यालय/परिसंस्थांनी त्यांना महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळालेल्या जागेऐवजी इतरत्र शासनाचे पूर्वपरवानगी व विहीत प्रक्रियेशिवाय स्थलांतरित झाल्याबाबत या विभागास तक्रारी प्राप्त होत आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११८ मधील तरतुदीनुसार राज्य शासनाची सहमती घेतल्यानंतर विद्यापीठाकडून परवानगी देण्यात येईल तसेच कलम १०८ (९) (झ) मधील तरतूदीनुसार विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय, व्यवस्थापनामध्ये कोणताही बदल किंवा त्यांचे हस्तांतरण किंवा महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या स्थानात बदल करण्यात येणार नाही.

महाविद्यालय/परिसंस्था स्थानांतरणासाठी प्रस्तुत विद्यापीठाकडे रितसर अर्ज करून विद्यापीठाचे ना हरकत प्रमाणपत्र घेवून त्यानंतर शासनाची परवानगी घेवून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११८ मधील तरतुदीस अनुसरून स्थानांतरण करणे आवश्यक आहे.

ज्या महाविद्यालय/परिसंस्थांच्या स्थानांतरणासाठी विद्यापीठाचे ना हरकत पत्र न घेता तसेच शासनाची परवानगी न घेता परस्पर महाविद्यालय स्थलांतरित केले आहेत अशा महाविद्यालय/परिसंस्थांना शैक्षणिक वर्ष २०२६– २०२७ पासून विद्यार्थी प्रवेशित करता येणार नाही, असे यापूर्वीचे या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार कळविण्यात आले होते. सदर निर्णय हा २०२७–२८ च्या प्रवेशासाठी लागू राहील याची नोंद घ्यावी.

महाविद्यालय/परिसंस्थांनी उपरोक्त निर्देशाचे पालन करणे अनिवार्य आहे सदरहू निर्देशांचे पालन न केल्यास या संदर्भात होणा–या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालय/परिसंस्थांवर राहील, आणि अशा महाविद्यालयावर विद्यापीठ अनुदान आयोग व विविध शिखर संस्था यांचे नियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, मधील तरतूदी तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (कसूरदार संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यावर लादावयाची शास्ती) एकरूप परिनियम, २०१८ मधील मुद्दा क्र. २ (९) नुसार कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात येत आहे.

कळावे,

आपला,

उपकुलसचिव,
(संलग्नता कक्ष)